# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा सभा दि. २०/०२/२०१८

**प्रकरण क्र. ६४ :- भाडेतत्वावर आकारण्यात आलेल्या मालमत्तांच्या कर आकारणी बाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे (मा. स्थायी समिती सभा दि.14/02/2018 प्र.क्र. 91, ठराव क्र.78)**

**ठराव क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये भाडेकरारनामा व्यतिरिक्त इतर मालमत्तांना मा. महासभेने ठरविलेल्या दरानुसार कर आकारणी करण्यंत येत आहे. तर प्रत्यक्ष भाडेकरारनामानुसार देण्यांत आलेल्या मालमत्तांना प्रत्यक्ष प्राप्त भाडयानुसार कर आकारणी करण्यांत येत आहे. त्यामुळे एकाच क्षेत्रफळाच्या मालमत्तांच्यां कर आकारणी मध्ये खुप तफावत होते. नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागत असून भाडे करारनामानुसार कर आकारणी केल्यास मालमत्ता धारकांस भाडयापासून मिळणारे उत्पन्न महानगरपालिका व इतर कराचा भरणा करावा लागत असल्यामुळे मालमत्ता धारकांस स्वतःच्या मालमत्तेवर नगण्य उत्पन्न मिळत आहे. परिणामी शहरातील उद्योग धंदयावर परिणाम होवून व्यावसायिक इतर ठिकाणी स्थलांतरीत होण्याच्या प्रमाणात खुप मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे त्यामुळे त्यावर अवलंबित असलेले छोटे-छोटे धंदे बंद होत आहेत. शहरात बेकारी वाढत आहे. तसेच हयामध्ये पळवाट निर्माण करणेकरीता जागामालक करारनामा बनविताना दोन वेगवेगळे करारनामा निर्माण करत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ८ नियम ७ नुसार करयोग्य मूल्य ठरविण्यासाठी वाजवी भाडयावर कर आकारणी करण्याची तरतुद करण्यांत आली आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस सुसुत्रता येणे आवश्यक आहे. कर आकारणीचे दर वाजवी ठेवल्यास अनेक मालमत्ता कर आकारणीच्या जाळयात येऊन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. त्याकरीता बिगर निवासी मालमत्ता (मोबाईल टॉवर व्यतिरिक्त) भाडयाने दिल्यास प्रत्यक्ष वार्षिक भाडयाच्या २०% इतके भाडे करयोग्य मुल्यासाठी वार्षिक भाडे गृहीत धरुन किंवा भाडेपट्टीने दिलेल्या बिगर निवासी मालमत्तांसाठी रु. १०/- प्र.चौ.फु. हा दर मासिक भाडे करीता गृहीत धरुन (जे जास्तीचे असेल त्यानुसार) आकारणी केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊन मालमत्ता धारकांस कर भरणे सोईचे होईल. सदर प्रस्तावाची अंमलबजावणी दि.१-४-२०१८ पासुन करण्यात यावी.

वरील प्रमाणे कर आकारणी करताना प्रस्तावित दरानुसार कर आकारणी करण्यांत यावी. तसेच सन २००८ नंतर केलेल्या अनधिकृत बांधकाम भाडयाने दिल्यास त्यावर उपरोक्त दरानुसार शास्तीसह कर आकारणी करावी. ज्या निवासी मालमत्ता बिगर निवासी वापर करून भाडयाने दिल्यास त्यावरही शास्तीसह कर आकारणी करणेस ही सभा मंजूरी देत आहे. तसेच महापालिकेची वर्षानुवर्षे मालमत्ता धारकांची थकबाकी आहे त्यांचेवर मोठ्या प्रमाणात व्याज देखील आकारणेत आलेले आहे. त्यामुळे कराचा भरणा करतेवेळी करधारक व प्रशासन यांच्यात नेहमी वाद होत असतात त्यामुळे महापालिकेचे वसुलीचे उद्दीष्ट्य पूर्ण होत नाही उद्दीष्ट्य पूर्ण होण्याच्या दृष्टीने ज्या थकबाकीदारांवर व्याजाची कर आकारणी केलेली आहे. दि.३१ मार्च २०१८ पूर्वी सर्व मालमत्ता कर व मोकळ्या जागेवरील करासह भरणा केल्यास त्यांना व्याजाच्या रक्कमेवर ५० टक्के सवलत देण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल** **अनुमोदन :- श्री. रवि व्यास**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | भोईर सुनिता शशिकांत | १ | कदम अर्चना अरुण | |
| २ | शाह रिटा सुभाष | २ | नलावडे दिनेश दगडु | |
| ३ | तिवारी अशोक सुर्यदेव | ३ | गुप्ता कुसुम संतोष | निरंक |
| ४ | पांडेय पंकज सूर्यमणि | ४ | पाटील धनेश परशुराम | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | पाटील रोहिदास शंकर | ५ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ६ | गोहिल शानू जोरावर सिंह | ६ | पाटील नरेश तुकाराम | |
| ७ | कांगणे मीना यशवंत | ७ | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | पाटील जयंतीलाल गुरुनाथ | |
| ९ | शेट्टी गणेश गोपाळ | ९ | घरत तारा विनायक | |
| १० | भोईर गणेश गजानन | १० | पांडे स्नेहा शैलेश | |
| ११ | पाटील प्रभात प्रकाश | ११ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | शिर्के अनंत गेणू | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १४ | शाह राकेश रतिशचंद्र | १४ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १५ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १५ | पाटील अनिता जयवंत | |
| १६ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | जैन गीता भरत | १७ | भोईर राजू यशवंत | |
| १८ | जैन सुनिता रमेश | १८ | शेख रुबीना फिरोझ | |
| १९ | जैन राजेंद्र भवरलाल | १९ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २० | भुप्ताणी रक्षा सतिश (शाह) | २० | भगवंत अनिल दिवाकर | |
| २१ | मोकाशी दिपाली आनंदराव | २१ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २२ | रकवी वैशाली गजेंद्र | २२ | भट दीप्ती शेखर | |
| २३ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | २३ | सपार उमा विश्वनाथ | |
| २४ | खंडेलवाल सुरेश जगदीश | २४ | अहमद साराह अकरम | |
| २५ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | २५ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| २६ | मेहता डिंपल विनोद | २६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| २७ | गेहलोत हसमुख मोहनलाल | २७ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २८ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २८ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २९ | थेराडे संजय अनंत | २९ | बांड्या एलायस दुमिंग | |
| ३० | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| ३१ | वैती चंद्रकांत सिताराम | | | |
| ३२ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर | | | |
| ३३ | पारधी सुजाता यशवंत | | | |
| ३४ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| ३५ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३६ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३७ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ३८ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ३९ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| ४० | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४१ | अरोरा दिपीका पंकज | | | |
| ४२ | बेलानी हेमा राजेश | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४४ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४५ | नाईक विविता विवेक | | | |
| ४६ | सोंस निला बर्नाड | | | |
| ४७ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४८ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ४९ | कासोदारीया अश्विन शामजीभाई | | | |
| ५० | जैन दिनेश तेजराज | | | |
| ५१ | भावसार वंदना संजय | | | |
| ५२ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ५३ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ५४ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ५५ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ५६ | भानुशाली वर्षा गिरधर | | | |
| ५७ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |

ठराव बहुमताने मंजूर

Dmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका